# जिल्हा व सत्र न्यायालय, ठाणे,
प्रभाकर हेगडे मार्ग, कोर्ट नाका, ठाणे प. ४००६०१
दूरध्वनी क्रमांक: ०२२-२५४७४५७४/२५४७९७२८/२५४७१६२४


संदर्भः- जिल्हा न्यायालय, ठाणे/ई-निविदा/ १ /२०२४ दि. ०२/०४/२०२४

## ई-निविदा सूचना

जिल्हा व सत्र न्यायालय, ठाणे व त्यांचे आधिपत्याखालील कल्याण, उल्हासनगर, मुरबाड, भिवंडी, शहापूर, वाडा, जव्हार, डहाणू, पालघर, बेलापूर, वसई, कल्याण रेल्वे, विरार रेल्वे या १३ तालुका न्यायालय व कार्यालयाकरीता कमीतकमी चौतीस (३४) छायांकन यंत्रासंबंधित सेवा प्रदान करणा-या सेवादात्यास कृष्णधवल (Black & White) छायाप्रत उपलब्ध करून देण्यासाठी मशीन व इतर यंत्र सामुग्री न्यायालयामध्ये स्थापीत करून उत्तम दर्जाचा कागद, शाई वापरून जास्तीचे काम असलेल्या ठिकाणी मशीन चालकासह व छायांकन प्रतिचे कामाचे प्रमाण कमी असलेल्या ठिकाणी मशीन चालक वगळून छायांकन प्रतीकरीता सेवा हमीचा वार्षिक करार करणेसाठी कार्यालयीन अटी व शर्तीनुसार एका वर्षासाठी सेवा पुरविण्यास इच्छुक असलेल्या व शासकीय आस्थापनांवर सेवा पुरविणा-या शासनमान्य निविदाधारकांकडून ई-निविदा मागविण्यात येत आहेत.

विस्तृत निविदा, अटी व शर्ती https://www.mahatenders.gov.in व https://thane.dcourts.gov.in/ या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

संपूर्ण निविदा प्रक्रिया ऑनलाईन व दोन लिफाफा पध्दतीमध्ये असून निविदा स्वीकारण्याचा अंतिम दिनांक १६/०४/२०२४ रोजी सायंकाळी ०५.०० पर्यंत असेल.

पुरवठादारांना ई-निविदेबाबत काही अडचणी असल्यास Helpdesk No. 1800 3070 2232 वर संपर्क साधावा.

# जिल्हा व सत्र न्यायालय, ठाणे

**प्रभाकर हेगडे मार्ग, कोर्ट नाका, ठाणे प. ४००६०१**

**दूरध्वनी क्रमांक: ०२२-२५४७४५७४/२५४७९७२८/२५४७१६२४**

**ई-मेल - mahthadc@mhstate.nic.in**

**संदर्भ:जिन्याठा/ई-निविदा/झेरॉक्स/१/२०२४** **दि. ०२/०४/२०२४**

---

जिल्हा व सत्र न्यायालय, ठाणे व त्यांचे आधिपत्याखालील कल्याण, उल्हासनगर, मुरबाड, भिवंडी, शहापूर, वाडा, जव्हार, डहाणू, पालघर, बेलापूर, वसई, कल्याण रेल्वे, विरार रेल्वे या १३ तालुका न्यायालये व कार्यालयाकरीता कमीतकमी चौतीस (३४) छायांकन यंत्रांसंबंधीत सेवा प्रदान करणा-या संबंधीत सेवादात्यास कृष्णधवल **(Black & White)** छाया प्रत उपलब्ध करून देण्यासंबंधीत मशीन व इतर यंत्र सामुग्री न्यायालयाचे कार्यालयामध्ये स्थापित करून उत्तम दर्जाचा कागद, शाई वापरून **जास्तीचे काम असलेल्या ठिकाणी मशीन चालकासह व छायांकन प्रतिचे कामाचे प्रमाण कमी असलेल्या ठिकाणी मशीन चालक वगळून** छायांकन प्रतीकरीता सेवाहमीचा वार्षिक करार करणेसाठी कार्यालयीन अटी व शर्तीनुसार एका वर्षासाठी सेवा पुरविण्यास इच्छुक असलेल्या व शासकीय आस्थापनांवर सेवा पुरविणा-या शासनमान्य निविदाधारकांकडून ई-निविदा मागविण्यात येत आहेत.

## विभाग १

| | | |
|---|---|---|
| १) निविदा स्वरुप | : | जिल्हा व सत्र न्यायालय, ठाणे व त्यांचे आधिपत्याखालील सर्व तालुका न्यायालय व कार्यालयांकरीता कमीतकमी चौतीस (३४) छायांकन यंत्रांचा पुरवठा करून सदर छायांकन यंत्रांची देखभाल व दुरूस्ती ही पुरवठादार/कंत्राटदार स्वखर्चाने करून कृष्णधवल **(Black & White)** छाया प्रत उपलब्ध करून देण्यासंबंधीत सेवा हमीचा एका वर्षासाठी करार करणेसाठी |
| २) निविदा फॉर्म फी | : | **रु. ३,३००/- ना - परतावा.** |
| ३) छायांकन यंत्राची संख्या अंदाजे | : | कमीतकमी चौतीस (३४) छायांकन यंत्र |
| ४) अंदाजित प्रती | : | १०,५०,००० प्रती वार्षिक |
| ५) बयाणा रक्कम | : | **रु. ५५,०००/-** (शासकीय नियमानूसार सूट असल्यास वगळून) शिथील |
| ६) कामाचा कालावधी | : | ०१ वर्ष |
| ७) सुरक्षा ठेव रक्कम | : | **रु. १,००,०००/- (अक्षरी एक लक्ष मात्र)** |
| ८) ई- निविदा विक्री व सादर करणेस सुरुवात दिनांक | : | **दिनांक ०४/०४/२०२४ सायं. ०५.०० वाजेपासून** |

९) ई-निविदा स्विकारणेचा अंतिम दिनांक : **दिनांक १६/०४/२०२४ सायं. ०५.०० पर्यंत**

१०) ई-निविदा उघडण्याचा दिनांक : अ) **तांत्रिक निविदा- लिफाफा क्र १ जिल्हा व सत्र न्यायालय, ठाणे येथे दिनांक १९/०४/२०२४ रोजी दुपारी ०२.३० वा. उघडण्यात येतील.**

ब) व्यापारी/आर्थिक निविदा- लिफाफा क्र २ तांत्रिक निविदेतील कागदपत्रांची पडताळणी झाल्यानंतर आर्थिक निविदा उघडणेबाबत निविदाधारकांना कळविण्यात येईल.

## विभाग २

जिल्हा व सत्र न्यायालय, ठाणे व त्यांचे आधिपत्याखालील कल्याण, उल्हासनगर, मुरबाड, भिवंडी, शहापुर वाडा, जव्हार, डहाणू, पालघर, बेलापूर, वसई, कल्याण रेल्वे, विरार रेल्वे या तालुका न्यायालय व कार्यालयाकरीता छायांकन यंत्रांसंबंधीत सेवा प्रदान करणा-या संबंधीत सेवादात्यास कृष्णधवल **(Black & White)** छायांकित प्रत उपलब्ध करून देण्यासंबंधीत मशीन व इतर यंत्र सामुग्री न्यायालयाचे आवारामध्ये स्थापीत करून सेवा देणेबाबतचे विवरणपत्र खालीलप्रमाणे:

| अनु. क्र | आस्थापनेचे नांव | छायांकन यंत्र | चालक |
|---|---|---|---|
| १ | जिल्हा न्यायालय, ठाणे | **१** | **१** |
| **२** | **मोटार अपघात दावा न्यायाधीकरण, ठाणे.** | | |
| ३ | दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, ठाणे | **१** | **१** |
| **४** | **मुख्य न्यायदंडाधिकारी न्यायालय, ठाणे** | **१** | **१** |
| **५** | **पहिले न्यायालय, ठाणे** | | |
| **६** | **दुसरे न्यायालय, ठाणे** | | |
| ७ | अपर जिल्हा व सत्र न्यायालय, कल्याण | **१** | **१** |
| **८** | **दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, कल्याण** | **१** | **१** |
| **९** | **दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर, कल्याण** | | |
| **१०** | **पहिले न्यायालय, कल्याण** | | |
| ११ | तिसरे न्यायालय, कल्याण | **१** | **१** |
| ***१२** | **रेल्वे न्यायालय, कल्याण** | **१** | |
| १३ | अपर जिल्हा व सत्र न्यायालय, भिवंडी | **१** | **१** |
| **१४** | **दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, भिवंडी** | | |

| अनु. क्र | आस्थापनेचे नांव | छायांकन यंत्र | चालक |
|---|---|---|---|
| **१५** | **सह दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर, भिवंडी** | १ | १ |
| **१६** | **२ रे सह दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर, भिवंडी** | | |
| **१७** | **दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर, उल्हासनगर** | १ | १ |
| **१८** | **सह दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर, उल्हासनगर** | | |
| १९ | अपर जिल्हा व सत्र न्यायालय, बेलापूर | १ | १ |
| **२०** | **दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, बेलापूर** | १ | १ |
| २१ | सह दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर, बेलापूर | | |
| ***२२** | **दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर, मुरबाड** | १ | .... |
| ***२३** | **दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर, शहापूर** | १ | .... |
| २४ | अपर जिल्हा व सत्र न्यायालय, वसई | १ | १ |
| **२५** | **दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, वसई** | | |
| २६ | सह दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर, वसई | १ | १ |
| २७ | अपर जिल्हा व सत्र न्यायालय, पालघर | १ | १ |
| **२८** | **दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, पालघर** | १ | १ |
| **२९** | **सह दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर, पालघर** | | |
| ***३०** | **दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर, वाडा** | १ | .... |
| **३१** | **दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर, डहाणू** | १ | १ |
| **३२** | **सह दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर, डहाणू** | | |
| ***३३** | **लोहमार्ग न्यायालय, विरार** | १ | .... |
| ***३४** | **दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर, जव्हार** | १ | .... |
| **३५** | **नियोजीत दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर, मिरा-भाईंदर (ठाणे)** | .... | .... |
| **३६** | **नियोजीत दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर, चिखलोली, अंबरनाथ** | .... | ..... |

**अ.** **उपरोक्त तक्त्यामध्ये * केलेल्या आस्थापनावर छायांकन प्रतिचे कामाचे प्रमाण कमी असल्याने सेवादात्यास त्या ठिकाणी मशीन चालक वगळून फक्त मशीन व इतर यंत्र सामुग्री न्यायालयाचे आवारामध्ये स्थापीत करून उत्तम दर्जाचा कागद, शाई वापरून छायांकन यंत्राची सेवा देणे बंधनकारक राहील.**

**ब.** **भविष्यात उपरोक्त तक्त्यामध्ये * केलेल्या आस्थापनावर छायांकन प्रतिचे कामाचे प्रमाण वाढल्यास सेवादात्यास या कार्यालयाच्या निर्देशानुसार छायांकन यंत्र व मशीन चालक देणे बंधनकारक राहील.**

४/...

# विभाग ३ :- अटी व शर्ती

१) ई-निविदा तांत्रिक लिफाफा (Technical Bid) व आर्थिक लिफाफा (Financial Bid) या दोन लिफाफा पध्दतीने मागविण्यात येत आहे. सदर कंत्राटाचा कालावधी एक वर्षाचा राहील.

२) निविदाधारकांना निविदा अर्ज, निविदेतील अटी व शर्ती, कामाचे स्वरुप यांची संक्षिप्त माहिती http://mahatenders.gov.in व https://thane.dcourts.gov.in संकेतस्थळावरुन डाउनलोड करता येतील.

३) **निविदा फॉर्म शुल्क :- निविदा फॉर्मची किंमत रक्कम रू. ३,३००/- ना-परतावा राहील. निविदा फॉर्म शुल्क ऑनलाईन पध्दतीने स्विकारण्यात येईल.**

४) **बयाणा रक्कम :- निविदा धारकाने बयाना रक्कम (EMD) रू. ५५,०००/- ऑनलाईन पध्दतीने भरणे निविदाधारकांवर बंधनकारक आहे. तसेच ज्या निविदाधारकांना बयाणा रक्कम भरणेपासून सुट असेल अशा निविदाधारकांनी त्यांचे सुट प्रमाणपत्र (Exemption Certificate) अपलोड करणे आवश्यक आहे.**

५) ज्या कंत्राटदाराची निविदा स्विकृत करण्यात येईल, त्यांना सदर कामाचे आदेश मिळालेपासून १० दिवसांचे आत सेवा करार करणे बंधनकारक असेल.

६) **सुरक्षा ठेव :- ज्या निविदाधारकाची निविदा मान्य करण्यात आली आहे, त्या निविदाधारकास रु. १,००,०००/- (अक्षरी एक लक्ष मात्र रुपये) रक्कमेची राष्ट्रीयकृत बँकेची एक वर्षाच्या कालावधीची बँक गॅरंटी या कार्यालयाकडे जमा करावी लागेल. तसेच कंत्राटदाराने कराराच्या कोणत्याही अटी व शर्तीचा भंग केल्यास, बॅंक गॅरंटीची रक्कम जप्त करण्याचा अधिकार या कार्यालयास राहील.**

७) निविदाधारकास छायांकन यंत्र भाडे तत्वावर पुरविणे व सदर छायांकन यंत्राच्या देखभाल, दुरुस्ती व छायांकन यंत्रामधील टोनर काट्रेज रिसायकलिंग करून देणेबाबत कामाचा कमीत कमी एक वर्षाचा अनुभव असणे आवश्यक आहे. त्यासंदर्भातील अनुभव प्रमाणपत्र अथवा तत्सम कागदपत्रे सादर करणे बंधनकारक आहे. तसेच निविदाधारकाची भागीदारी संस्था असल्यास, भागीदारांचे नावे तसेच त्यांना सदर निविदेकरिता जबाबदार असलेले अधिकारी नमुद करणे आवश्यक आहे.

८) निविदा लिफाफ्यासोबत सादर करावयाची कागदपत्रे :-

**तांत्रिक लिफाफा (Technical Bid) लिफाफा क्रमांक १** -

निविदाधारकांनी ई-निविदेतील तांत्रिक लिफाफ्यामध्ये आवश्यक ते सर्व कागदपत्रे अपलोड करणे आवश्यक आहे.

१. निविदाधारकाने बयाणा रक्कम ऑनलाईन अदा केलेल्या पावतीची प्रत.

२. कंपनी/संस्था नोंदणीची छायांकित प्रत किंवा Memorandum of Association (MoA)/Article of Association (AoA) ची छायांकित प्रत किंवा भागीदार संस्था असल्यास भागीदारी कराराची प्रत व नोंदणी केल्याची प्रत.

३. आस्थापना व दुकाने अधिनियमानुसार नोंदणी केलेल्या परवान्याची प्रत.
४. मागील १ वर्षाचे आयकर विवरणपत्रे.
५. कंपनी अथवा संस्था प्रमुखाचे पॅनकार्डची साक्षांकित प्रत.
६. जी.एस.टी कर नोंदणी प्रमाणपत्र.
७. मागील तीन वर्षाचे अनुभव प्रमाणपत्र किंवा तत्सम कागदपत्रे
८. निविदेतील सर्व अटी व शर्ती मान्य असलेबाबतचे हमीपत्र
९. ई-निविदाकाराने स्वत:वर कोणताही गुन्हा दाखल नसल्याबाबतचे तसेच त्याच्या संदर्भात कोणतेही प्रकरण न्यायालयात प्रलंबित नसल्याबाबतचे नोटरी केलेले प्रतिज्ञापत्र दाखल करावे.

९) **तांत्रिक लिफाफा उघडणेकरिता निविदाधारकांनी स्वत: अथवा त्यांचे अधिकृत प्रतिनिधींनी (योग्य त्या अधिकारपत्रासह) तांत्रिक लिफाफ्यामध्ये अपलोड केलेल्या कागदपत्रांच्या मुळ व त्यांची छायांकित प्रत पडताळणी करिता सादर करणे बंधनकारक आहे. निविदाधारकांनी मुळ कागदपत्रे तपासणीसाठी सादर न केल्यास अथवा कागदपत्रे अपूर्ण सादर केल्यास किंवा अपलोड केलेल्या प्रती अणि मुळ प्रतींमध्ये फरक/तफावत आढळल्यास सदर निविदा, अस्विकृत/रद्द समजण्यात येईल.**

१०) **तांत्रिक लिफाफा उघडणेकरिता व कागदपत्रांची पडताळणी करणेकरिता दिनांक १९/०४/२०२४ रोजी दुपारी ०२.३० वाजता जिल्हा व सत्र न्यायालय, ठाणे येथे निविदाधारकांनी अथवा त्याचे प्रतिनिधींनी योग्य त्या अधिकारपत्रासहीत हजर असणे आवश्यक आहे.**

११) तांत्रिक लिफाफ्यामध्ये सादर केलेल्या कागदपत्रांची तपासणी केल्यानंतर पात्र व अपात्र निर्णय घेण्याचा संपूर्ण अधिकार मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, ठाणे यांचे अधिपत्याखालील समितीस राहील. पात्र ठरविणेत आलेल्या निविदाधारकांचेच व्यापारी/आर्थिक लिफाफा उघडण्यात येतील.

१२) तांत्रिक लिफाफ्यात पात्र झालेल्या निविदाधारकांना व्यापारी/आर्थिक लिफाफा उघडणेचा दिनांक व वेळ नंतर कळविण्यात येईल याची निविदाधारकांनी नोंद घ्यावी.

१३) **आर्थिक लिफाफा (Financial Bid) लिफाफा कमांक २** -
व्यापारी/आर्थिक लिफाफा: निविदाधारकांनी सदर लिफाफा **https://mahatenders.gov.in** या संकेतस्थळावर ई-निविदेतील **BOQ** मध्ये विहित केलेल्या नमुन्यातच सादर करणे आवश्यक आहे.

१४) व्यापारी/आर्थिक लिफाफा हा ऑनलाईन पध्दतीनेच सादर करावा.

१५) **व्यापारी/आर्थिक लिफाफा उघडतेवेळी पात्र निविदाधारकांनी स्वत: किंवा त्यांचे अधिकृत प्रतिनिधी यांनी निविदाधारकाने प्रदान केलेल्या योग्य त्या अधिकार पत्रासह उपस्थित रहावे.**

१६) तांत्रिक कारणामुळे ई-निविदा प्रकियेतील वेळापत्रकात बदल केला जाऊ शकतो. त्याबाबत सुचना कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर तसेच संकेतस्थळावर वेळोवेळी प्रदर्शित केल्या जातील.

१७) सदर कामाचे कोणत्याही स्तरावर एक अथवा सर्व ई-निविदा कोणतेही कारण न देता रद्द करण्याचे सर्व अधिकार मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, ठाणे यांचे अध्यक्षतेखालील समितीने राखून ठेवले आहेत.

१८) निविदाकार यांना जिल्हा व सत्र न्यायालय, ठाणे व त्यांचे आधिपत्याखालील कल्याण, उल्हासनगर, मुरबाड, भिवंडी, शहापुर, वाडा, जव्हार, डहाणू, पालघर, बेलापूर, वसई, कल्याण रेल्वे, विरार रेल्वे या तालुका न्यायालय व कार्यालयाकरीता छायांकन यंत्रांसंबंधीत सेवा प्रदान करणा-या संबंधीत सेवादात्यास मशीन व इतर यंत्र सामुग्री स्वखर्चाने स्थापित करून सेवा देणे बंधनकारक राहील

१९) कंत्राटदारास सर्व कामाच्या दिवशी सकाळी ९.३० ते संध्याकाळी ७.०० या वेळेत छायांकन यंत्राची सेवा द्यावयाची आहे. तसेच आवश्यकता भासल्यास रविवार व सार्वजनीक सुट्टीच्या दिवशी कार्यालय सांगेल त्या वेळी छायांकन यंत्राची सेवा देणे कंत्राटदारास बंधनकारक असेल. त्याकरीता अतिरिक्त शुल्क दिले जाणार नाही.

२०) **निविदाकार यांना जिल्हा व सत्र न्यायालय, ठाणे व त्यांचे आधिपत्याखालील कल्याण, उल्हासनगर, मुरबाड, भिवंडी, शहापुर, वाडा, जव्हार, डहाणू, पालघर, बेलापूर, वसई, कल्याण रेल्वे, विरार रेल्वे या तालुका न्यायालय व कार्यालयाकरीता छायांकन यंत्र संबंधीत सेवा प्रदान करणा-या संबंधीत सेवादात्यास जास्तीचे काम असलेल्या ठिकाणी मशीन चालकासह व छायांकन प्रतिचे कामाचे प्रमाण अत्यल्प असलेल्या ठिकाणी मशीन चालक वगळून सेवा देणे बंधनकारक असेल.**

२१) निविदाकार यांना जिल्हा व सत्र न्यायालय, ठाणे व त्यांचे आधिपत्याखालील कल्याण, उल्हासनगर, मुरबाड, भिवंडी, शहापुर, वाडा, जव्हार, डहाणू, पालघर, बेलापूर, वसई, कल्याण रेल्वे, विरार रेल्वे या तालुका न्यायालय व कार्यालयाकरीता छायांकन यंत्रांसंबंधीत सेवा प्रदान करणा-या संबंधीत सेवादात्यास मशीन व इतर यंत्र सामुग्री न्यायालयाचे आवारामध्ये स्थापीत करण्याकरीता जागा उपलब्ध करून देण्यात येईल. सदर जागेवर निविदाकारांचा हक्क असणार नाही. तसेच सदर जागेचा गैरवापर करावयाचा नाही. ज्यावेळी सदर जागा रिक्त करण्यास सांगितले जाईल त्यावेळी कंत्राटदारास सदर जागा ३ दिवसांच्या आत या कार्यालयाच्या स्वाधीन करावी लागेल. त्याबाबत कंत्राटदाराने कोणताही आक्षेप किंवा विवाद निर्माण करावयाचा नाही.

२२) निविदाकार यांना जिल्हा व सत्र न्यायालय, ठाणे व त्यांचे आधिपत्याखालील कल्याण, उल्हासनगर, मुरबाड, भिवंडी, शहापुर, वाडा, जव्हार, डहाणू, पालघर, बेलापूर, वसई, कल्याण रेल्वे, विरार रेल्वे या तालुका न्यायालय व कार्यालयाकरीता छायांकन यंत्र संबंधीत सेवा प्रदान करणा-या संबंधीत सेवादात्यास मशीन व इतर यंत्र सामुग्री चालविण्यासाठी या कार्यालयाकडून वेगळे विद्युत मीटर बसून देण्यात येईल. छायांकन यंत्र चालविण्यासाठी दरमहा वापरलेल्या विद्युत युनीटचे देयक निविदाकार यांना स्वखर्चाने अदा करणे बंधनकारक असेल.

२३) कंत्राटदारास त्याने सदर कामासाठी नेमलेल्या छायांकन यत्र चालकांना किमान वेतन अधिनियम १९४८ मधील तरतुदीनुसार वेतन, महागाई भत्ता, इतर भत्ते व सवलती लागु करणे कंत्राटदारावर बंधनकारक असेल.

२४) कंत्राटदार यांना देण्यात आलेल्या कंत्राटी सेवेबद्दल ते किंवा त्यांचेवतीने नेमण्यात आलेल्या छायांकन यंत्र चालक यांना या कार्यालयाकडे कायमस्वरूपी नियुक्तीकरीता हक्क मागण्याचा अधिकार राहणार नाही.

२५) जिल्हा व सत्र न्यायालय, ठाणे व त्यांचे आधिपत्याखालील कल्याण, उल्हासनगर, मुरबाड, भिवंडी, शहापुर, वाडा, जव्हार, डहाणू, पालघर, बेलापूर, वसई, कल्याण रेल्वे, विरार रेल्वे या तालुका न्यायालय व कार्यालयाकरीता छायांकन यंत्र संबंधीत सेवा प्रदान करणा-या संबंधीत सेवादात्यास मशीन व इतर यंत्र सामुग्रीची अपघाताने/दुर्घटनेमुळे नुकसान झाल्यास तसेच कंत्राटदाराने नेमलेल्या मशीन चालकास काम करतांना कोणतीही इजा, अपघात अथवा मनुष्यहानी झाल्यास त्याची व भरपाईची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदाराची राहील. त्यास हे कार्यालय कोणत्याही प्रकारे जबाबदार असणार नाही.

२६) जिल्हा व सत्र न्यायालय, ठाणे व त्यांचे आधिपत्याखालील कल्याण, उल्हासनगर, मुरबाड, भिवंडी, शहापुर, वाडा, जव्हार, डहाणू, पालघर, बेलापूर, वसई, कल्याण रेल्वे, विरार रेल्वे या तालुका न्यायालय व कार्यालयाकरीता छायांकन यंत्र संबंधीत सेवा प्रदान करणा-या संबंधीत सेवादात्यास मशीन व इतर यंत्र सामुग्रीची अपघाताने/दुर्घटनेमुळे नुकसान झाल्यास तसेच कंत्राटदाराने नेमलेल्या मशीन चालकास काम करतांना कोणतीही इजा, अपघात अथवा मनुष्यहानी झाल्यास त्याची भरपाई करण्याकरीता कंत्राटदारानी विमा पॉलिसीची सदस्यता घेतली पाहिजे. अशी विमा पॉलिसी कार्यालयाकडून मागणी करताच सादर करावी लागेल.

२७) निविदाकार यांना जिल्हा व सत्र न्यायालय, ठाणे व त्यांचे आधिपत्याखालील कल्याण, उल्हासनगर, मुरबाड, भिवंडी, शहापुर, वाडा, जव्हार, डहाणू, पालघर, बेलापूर, वसई, कल्याण रेल्वे, विरार रेल्वे या तालुका न्यायालय व कार्यालयाकरीता छायांकन यंत्रांसंबंधीत सेवा प्रदान करणा-या संबंधीत सेवादात्यास पुरविण्यात येणा-या छायांकन प्रतीकरीता वापरण्यात येणारा झेरॉक्स पेपरचा दर्जा हा चांगल्या प्रतीचा असणे आवश्यक आहे. झेरॉक्स पेपर हा ८०/७५ GSM चा व JK Paper LTD. (JK Sparkle) या नामांकित कंपनीचे असणे आवश्यक आहे.

२८) जिल्हा व सत्र न्यायालय, ठाणे व त्यांचे अधिन सर्व तालुका न्यायालयीन आस्थापनांवरील (कल्याण, उल्हासनगर, मुरबाड, भिवंडी, शहापूर, वाडा, जव्हार, डहाणू, पालघर, वसई, वाशी, कल्याण रेल्वे, विरार रेल्वे) छायांकन यंत्रांसंबंधीत सेवा प्रदान करणा-या संबंधीत सेवादात्यास कृष्णधवल **(Black & White)** छायांकित प्रत उपलब्ध करून देण्यासंबंधीत मशीन व इतर यंत्र सामुग्री तालुका न्यायालयात स्वखर्चाने घेवुन जाणे व छायांकन यंत्राची देखभाल व दुरूस्ती ही पुरवठादार/कंत्राटदार स्वखर्चाने करून घेणे बंधनकारक राहिल.

२९) छायांकन यंत्रामधील सर्व भाग/पार्ट्स उदा. शाई, ड्रम, ब्लेड, चीप किंवा इतर सर्वांगिण पुनर्वापरासाठी आवश्यक असलेले भाग/पार्ट्स हे अधिकृत कंपनीचे/दर्जेदार असावेत. सदर खरेदीकामी येणारा सर्व खर्च हा कंत्राटदाराचा असेल.

३०) छायांकन यंत्र व यंत्राचे सुट्टे भाग खरेदी व दुरुस्तीकामी कोणताही अतिरिक्त खर्च दिला जाणार नाही.

३१) कार्यालयाने छायांकन प्रती काढण्यासाठी दिलेली कागदपत्रे, दस्तऐवज सुरक्षितरित्या परत करण्याची जबाबदारी कंत्राटदारावर असेल व त्याबाबत त्यांनी खबरदारी घ्यायची आहे.

३२) कंत्राटदार व त्यांनी नेमून देण्यात आलेल्या मशीन चालकास या कार्यालयाने छायांकन प्रती काढण्यासाठी दिलेली कागदपत्रे, दस्तऐवजामध्ये कोणत्याही प्रकारची छेडछाड करता कामा नये. तसे आढळल्यास कंत्राटदारावर कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल.

३३) कंत्राटदाराने प्रत्येक मशीनवर किती प्रती झाल्या याचा मासिक अहवाल संबंधित मशीनवरुन काढून जिल्हा न्यायालय, ठाणे येथे प्रत्येक महिन्यास सादर करावा. कंत्राटदारास फक्त व्यवस्थित व ठळक आलेल्या छायाप्रतींचेच शुल्क दिले जाईल.

३४) कंत्राटदाराने प्रत्येक दिवशी मशीनवर किती प्रती झाल्या याबाबतची नोंदवही ठेवणे व त्यावर कार्यालयातील अधिक्षाक/सहा. अधिक्षाक यांची स्वाक्षरी घेणे बंधणकारक असेल.

३५) निविदाकाराने सदर कंत्राट कोणत्याही परिस्थितीत इतरांना हस्तांतरीत करता येणार नाही. तसेच इतर व्यक्तीस पोटभाडयाने देता येणार नाही व या कार्यालया व्यतिरिक्त बाहेरील इतर कुणाचेही छायाप्रतींचे काम करता येणार नाही.

३६) छायांकन यंत्र भाडेतत्वावर घेणेबाबत करण्यात आलेल्या सेवाहमीच्या करारापोटी कंत्राटदाराला मासिक तत्वावर त्या त्या आस्थापनेवरुन देयक दिले जाईल.

३७) निविदाकाराने दरमहा छायांकन प्रतींच्या संख्येबाबत अहवालासोबत देयक सादर करणे बंधनकारक राहील. तसेच प्रशासकीय पूर्तता पूर्ण होवून कोषागार कार्यालय, ठाणे यांचेकडून मंजूर झालेनंतर सदरचे देयकाची रक्कम कंत्राटदारास अदा करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

३८) सदर कामासाठी देण्यात येणारे देयक मिळणेकामी तगादा लावु नये. देयक अदा करण्याबाबत योग्य ती नियमानुसार कार्यवाही करुनच देयक अदा करण्यात येईल.

३९) कंत्राटदारास जिल्हा व सत्र न्यायालय, ठाणे व त्यांचे अधिपत्याखालील सर्व तालुका कल्याण, उल्हासनगर, मुरबाड, भिवंडी, शहापूर, वाडा, जव्हार, डहाणू, पालघर, वसई, बेलापूर, कल्याण रेल्वे, विरार रेल्वे येथील न्यायालयांनी छायांकन यंत्र बंद असल्याबाबत तक्रार केलेनंतर एक दिवसाचे आत छायांकन यंत्र दुरुस्ती करून देणे बंधनकारक राहील. तसेच कंत्राटदारास जास्त काम असलेल्या ठिकाणी अतिरिक्त छायांकन यंत्रांची सुविधा पुरविणे बंधनकारक राहील.

४०) जिल्हा न्यायालय, ठाणे व त्यांचे अधिपत्याखालील कमीकमी ३४ छायांकन यंत्र चालु ठेवणे व सुस्थितीत ठेवणे आवश्यक आहे. छायांकन यंत्र ४८ तासांपेक्षा जास्त कालावधीसाठी बंद अथवा नादुरुस्त राहणार नाही याची काळजी कंत्राटदार यांनी घ्यावयाची आहे. तसेच ज्या आस्थापनेवर छायांकन यंत्र अधिक काळ बंद राहील तेथे स्वखर्चाने एक अतिरिक्त छायांकन यंत्राची तजवीज कंत्राटदार यांनी त्वरीत करावयाची आहे. तसेच अतिरिक्त छायांकन यंत्राचे मीटर रिडींग मासिक देयकात समाविष्ट करावयाचे आहे.

४१) छायांकन यंत्र अधिक काळ बंद राहिल्यास व संबंधित आस्थापनेकडुन असमाधानकारक वाटल्यास सदरचा करार रद्द करण्याचे सर्वस्वी अधिकार मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, ठाणे यांचे अध्यक्षतेखालील समितीने राखून ठेवले आहेत.

४२) निविदाकार हे कार्यालयात काम करतांना त्यांचे नजरेस ज्या काही न्यायालयीन कामाच्या बाबी येतील त्या न्यायालयीन बाबी आहेत याची जाणीव ठेवून त्याबाबत आवश्यक ती गोपनियता ठेवतील. तसेच न्यायालयीन कामकाजात कोणत्याही प्रकारचा हस्तक्षेप होणार नाही याबाबतची दक्षता घेतील. न्यायालयीन कामकाजात हस्तक्षेप केल्याचे आढळल्यास कायदेशीर कारवाई करुन कंत्राट रद्द करणेत येईल.

४३) या कार्यालयाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या सूचना हे कंत्राटदार यांच्यावर बंधनकारक राहतील व त्याचप्रमाणे विहीत केलेल्या गुणवत्तेनूसार ते काम करणे कंत्राटदारावर बंधनकारक असेल.

४४) कंत्राटदारामार्फत नियुक्त केलेल्या मशीन चालक/कामगारांकडून शासकीय मालमत्तेचे नुकसान झाल्याचे आढळल्यास, सदरची नुकसान भरपाई ही कंत्राटदारास देय असलेल्या रकमेतून वसूल करण्यात येईल.

४५) छायांकन प्रतीचा दर्जा व प्रतींची संख्या याबाबत पुरविण्यात येणारी सेवा अयोग्य/असमाधानकारक वाटल्यास सदरचा करार रद्द करण्याचे सर्वस्वी अधिकार मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, ठाणे यांचे अध्यक्षतेखालील समितीने राखून ठेवले आहेत.

४६) कंत्राटदार यांना मुदतीपुर्वी करार रद्द करावयाचा असल्यास एक महिना आगाऊ नोटीस देणे बंधनकारक असेल.

४७) **सर्व ई-निविदा या दुसरा मजला, लायब्ररी हॉल, जिल्हा व सत्र न्यायालय, ठाणे येथे दिलेल्या तारखेस व वेळी उघडण्यात येतील.**

४८) केवळ ई-निविदा किंवा बयाना/अनामत रक्कम जमा केली म्हणुन कंत्राटावर हक्क सांगता येणार नाही.

.....................

# विभाग ४ :- निविदा वेळापत्रक

| अ. क | तपशील | दिनांक | वेळ |
|---|---|---|---|
| १ | ई निविदा विक्री व सादर करणेस सुरुवात दिनांक | ०४/०४/२०२४ | सायं. ०५.०० पासून |
| २ | ई निविदा सादर करणेचा अंतिम दिनांक | १६/०४/२०२४ | सायं. ०५.०० पर्यंत |
| ३ | तांत्रिक निविदा उघडण्याचा दिनांक | १९/०४/२०२४ | दुपारी ०२.३० वाजता |
| ४ | आर्थिक निविदा उघडण्याचा दिनांक | तांत्रिक निविदेतील कागदपत्रांची पडताळणी झाल्यानंतर आर्थिक निविदा उघडणेबाबत निविदाधारकांना कळविण्यात येईल. | |

# परिशिष्ट

जिल्हा व सत्र न्यायालय, ठाणे व त्यांचे आधिपत्याखालील कल्याण, उल्हासनगर, मुरबाड, भिवंडी, शहापुर वाडा, जव्हार, डहाणू, पालघर, बेलापूर, वसई, कल्याण रेल्वे, विरार रेल्वे या तालुका न्यायालये व कार्यालयाकरीता छायांकन यंत्रा संबंधीत सेवा प्रदान करणा-या सेवादात्यास कृष्णधवल **(Black & White)** छायांकित प्रत उपलब्ध करून देण्यासाठी मशीन व इतर यंत्र सामुग्री न्यायालयाचे इमारती व कार्यालयामध्ये स्थापित करून सेवा देणेबाबतचे विवरणपत्र खालीलप्रमाणे :

| अनु. क्र | आस्थापनेचे नांव | छायांकन यंत्र | चालक |
|---|---|---|---|
| १ | जिल्हा न्यायालय, ठाणे | **१** | **१** |
| **२** | **मोटार अपघात दावा न्यायाधीकरण, ठाणे.** | | |
| ३ | दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, ठाणे | **१** | **१** |
| **४** | **मुख्य न्यायदंडाधिकारी न्यायालय, ठाणे** | **१** | **१** |
| **५** | **पहिले न्यायालय, ठाणे** | | |
| **६** | **दुसरे न्यायालय, ठाणे** | | |
| ७ | अपर जिल्हा व सत्र न्यायालय, कल्याण | **१** | **१** |
| **८** | **दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, कल्याण** | **१** | **१** |
| **९** | **दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर, कल्याण** | | |
| **१०** | **पहिले न्यायालय, कल्याण** | | |
| ११ | तिसरे न्यायालय, कल्याण | **१** | **१** |
| ***१२** | **रेल्वे न्यायालय, कल्याण** | **१** | |
| १३ | अपर जिल्हा व सत्र न्यायालय, भिवंडी | **१** | **१** |
| **१४** | **दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, भिवंडी** | | |
| **१५** | **सह दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर, भिवंडी** | **१** | **१** |
| **१६** | **२ रे सह दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर, भिवंडी** | | |
| **१७** | **दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर, उल्हासनगर** | **१** | **१** |
| **१८** | **सह दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर, उल्हासनगर** | | |
| १९ | अपर जिल्हा व सत्र न्यायालय, बेलापूर | **१** | **१** |
| **२०** | **दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, बेलापूर** | **१** | **१** |
| २१ | सह दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर, बेलापूर | | |

**११/...**

| अनु. क्र | आस्थापनेचे नांव | छायांकन यंत्र | चालक |
|---|---|---|---|
| ***२२** | **दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर, मुरबाड** | **१** | .... |
| ***२३** | **दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर, शहापूर** | **१** | .... |
| २४ | अपर जिल्हा व सत्र न्यायालय, वसई | **१** | **१** |
| **२५** | **दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, वसई** | | |
| २६ | सह दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर, वसई | **१** | **१** |
| २७ | अपर जिल्हा व सत्र न्यायालय, पालघर | **१** | **१** |
| **२८** | **दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, पालघर** | **१** | **१** |
| **२९** | **सह दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर, पालघर** | | |
| ***३०** | **दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर, वाडा** | **१** | .... |
| **३१** | **दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर, डहाणू** | **१** | **१** |
| **३२** | **सह दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर, डहाणू** | | |
| ***३३** | **लोहमार्ग न्यायालय, विरार** | **१** | .... |
| ***३४** | **दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर, जव्हार** | **१** | .... |
| **३५** | **नियोजीत दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर, मिरा-भाईंदर (ठाणे)** | .... | .... |
| **३६** | **नियोजीत दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर, चिखलोली, अंबरनाथ** | .... | ..... |

## विभाग ५ :- निविदा अर्ज

| | | |
|---|---|---|
| निविदा मागविणा-या कार्यालयाचे नांव | : | जिल्हा व सत्र न्यायालय, ठाणे |
| कामाचे स्वरुप | : | जिल्हा व सत्र न्यायालय, ठाणे व त्यांचे आधिपत्याखालील तालुका न्यायालय व कार्यालयाकरीता कमीतकमी चौतीस (३४) छायांकन यंत्राचा पुरवठा करून सदर छायांकन यंत्राची देखभाल व दुरूस्ती ही पुरवठादार/कंत्राटदार स्वखर्चाने करून कृष्णधवल **(Black & White)** छाया प्रत उपलब्ध करून देण्यासंबंधीत सेवाहमीचा एका वर्षासाठी करार करणेसाठी |
| निविदा क्रमांक | : | ***जिन्याठा/ई-निविदा/झेरॉक्स/१/२०२४,दि.०२/०४/२०२४*** |
| कंत्राटदार संस्थेचे/ कंपनीचे नाव | : | |
| कंत्राटदार संस्थेचा/ कंपनीचा संपूर्ण पत्ता | : | |
| कंत्राटदार संस्थेचा/कंपनीचा संपर्क दूरध्वनी | : | |
| कंत्राटदार संस्थेचा / कंपनीचा नोंदणी क्र. | : | |
| कंत्राटदार संस्थेचा जी.एस.टी. नोंदणी क्र. | : | |

# विवरणपत्र

| | | |
|---|---|---|
| १ | निविदा कंत्राटदाराचे/संस्थेचे कंपनीचे नांव | |
| २ | निविदाकाराकडे सदर कामाचा पूर्वीचा अनुभव आहे काय? सध्या कोणकोणत्या संस्थेत काम सुरू आहे त्याचा संपुर्ण तपशील | |
| ३ | निविदाकाराने खालील बाबींची पुर्तता केली आहे काय ? | |
| | १. निविदाधारकाने बयाणा रक्कम ऑनलाईन अदा केलेल्या पावतीची प्रत.<br>२. कंपनी/संस्था नोंदणीची छायांकित प्रत किंवा Memorandum of Association (MoA)/Article of Association (AoA) ची छायांकित प्रत किंवा भागीदार संस्था असल्यास भागीदारी कराराची प्रत व नोंदणी केल्याची प्रत.<br>३. आस्थापना व दुकाने अधिनियमानुसार नोंदणी केलेल्या परवान्याची प्रत.<br>४. मागील १ वर्षाचे आयकर विवरणपत्रे.<br>५. कंपनी अथवा संस्था प्रमुखाचे पॅनकार्डची साक्षांकित प्रत.<br>६. जी.एस.टी कर नोंदणी प्रमाणपत्र.<br>७. अनुभव प्रमाणपत्र किंवा तत्सम कागदपत्रे<br>८. निविदा अर्ज विभाग क्रं. ५ नुसार<br>९. निविदेतील सर्व अटी व शर्ती मान्य असलेबाबतचे हमीपत्र | |
| ४. | निविदाकाराने स्वत:वर कोणताही गुन्हा दाखल नसल्याबाबतचे तसेच त्याच्या संदर्भात कोणतेही प्रकरण न्यायालयात प्रलंबित नसल्याबाबतचे नोटरी केलेले प्रतिज्ञापत्र दाखल करावे. | |

निविदाकाराचे नांव शिक्का व सही

ठाणे
दिनांक : / /२०२४

# प्रपत्र १

जिल्हा व सत्र न्यायालय, ठाणे व त्यांचे आधिपत्याखालील कल्याण, उल्हासनगर, मुरबाड, भिवंडी, शहापुर, वाडा, जव्हार, डहाणू, पालघर, बेलापूर, वसई, कल्याण रेल्वे, विरार रेल्वे या तालुका न्यायालय व कार्यालयाकरीता कमीतकमी चौतीस (३४) छायांकन यंत्रा संबंधीत सेवा प्रदान करणा-या संबंधीत सेवादात्यास कृष्णधवल **(Black & White)** छाया प्रत उपलब्ध करून देण्यासंबंधीत मशीन व इतर यंत्र सामुग्री न्यायालयाचे आवारामध्ये स्थापीत करून छायांकन यंत्राची देखभाल व दुरूस्ती ही पुरवठादार/कंत्राटदार स्वखर्चाने करून घेईल. तसेच उत्तम दर्जाचा कागद, शाई वापरून छायांकन प्रतीकरीता सेवाहमीचा वार्षिक करार करणेसंबंधात निविदेसाठी दयावयाचा दरांचा तपशीलवार तक्ता :

| अ. क्र. | कामाचे स्वरूप | A-4 Page प्रति पाना साठी दर सर्व करासह | A-F/AS Page प्रति पाना साठी दर सर्व करासह | A-3 Page प्रति पाना साठी दर सर्व करासह | एकत्रित दर (३+४+५) सर्व करासह |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १. | छायांकन यंत्राचा पुरवठा करून सदर छायांकन यंत्राची देखभाल व दुरूस्ती ही पुरवठादार / कंत्राटदार स्वखर्चाने करून कृष्णधवल **(Black & White)** छाया प्रत उपलब्ध करून देणे | | | | |

पुरवठादाराचे/फर्मचे नांव ....................................................
पुरवठादाराचा पत्ता / भ्रमणध्वनीसह ............................
पुरवठादाराची स्वाक्षरी ........................................................

# हमीपत्र

मी, श्री. --------------------, प्रो. प्रा. -------------- इंटरप्रायजेस, पत्ता, ------------------------------------ संस्थेचा नोंदणी क्रमांक -----------------, संस्थेचा दूरध्वनी क्रमांक ------ याव्दारे असे हमीपत्र लिहून देत आहे की, आपल्या कार्यालयामार्फत जाहीर करण्यात आलेल्या जिल्हा व सत्र न्यायालय, ठाणे व त्यांचे आधिपत्याखालील कल्याण, उल्हासनगर, मुरबाड, भिवंडी, शहापुर, वाडा, जव्हार, डहाणू, पालघर, बेलापूर, वसई, कल्याण रेल्वे, विरार रेल्वे या १३ तालुका न्यायालये व कार्यालयाकरीता कमीतकमी चौतीस (३४) छायांकन यंत्रा संबंधीत सेवा प्रदान करणा-या सेवादात्यास कृष्णधवल **(Black & White)** छाया प्रत उपलब्ध करून देण्यासाठी मशीन व इतर यंत्र सामुग्री न्यायालयाचे इमारत व कार्यालयामध्ये स्थापित करून उत्तम दर्जाचा कागद, शाई वापरून छायांकन प्रतीकरीता सेवाहमीचा वार्षिक करार करणेसाठी निविदा भरतांना निविदा अर्जासोबतचे निविदा सूचनेमध्ये नमूद केलेल्या आपल्या कार्यालयातील कामाची माहिती करून त्यानुसार निविदा भरली आहे. तसेच मी / आम्ही पुरवठादार सर्व अटी व शर्तिंचे पालन करण्यास बांधिल आहोत.

आपल्या कार्यालयाने सदर सेवेसाठी निर्गमित केलेले निर्देशन आमचेवर / भागीदारावर बंधनकारक राहील.

ठिकाण :

दिनांक : / /२०२४ स्वाक्षरी व शिक्का